# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-०४.

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) सप्टेंबर -ऑक्टोबर २०२१ पुरवणी परीक्षा वेळापत्रकाबाबत.

### प्रकटन

---

सन २०२१ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) मुख्य परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊ न शकलेल्या तसेच ए.टी.के.टी.साठी पात्र विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा सप्टेंबर -ऑक्टोबर २०२१ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १. | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) | बुधवार दिनांक २२/०९/२०२१ ते शुक्रवार दिनांक ०८/१०/२०२१ |
| २. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) सर्वसाधारण व व्दिलक्षी विषय (जूना व पुनर्रचित अभ्यासक्रम) | गुरूवार दिनांक १६/०९/२०२१ ते सोमवार दिनांक ११/१०/२०२१ |
| ३. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व्यवसाय अभ्यासक्रम (जूना व पुनर्रचित अभ्यासक्रम) | गुरूवार दिनांक १६/०९/२०२१ ते शुक्रवार दिनांक ०८/१०/२०२१ |

इ.१० वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा मंगळवार दिनांक २१/०९/२०२१ ते सोमवार दिनांक ०४/१०/२०२१ व इ.१२ वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा बुधवार दिनांक १५/०९/२०२१ ते सोमवार दिनांक ०४/१०/२०२१ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेल्या परीक्षांचे दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in संकेतस्थळावर दिनांक २७/०८/२०२१ पासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे विभागीय मंडळामार्फत छापील स्वरुपात दिलेलेच वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरुनच परीक्षेच्या तारखांची खात्री करुन घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने किंवा खाजगी यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राहय धरु नये, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांकः २७/०८/२०२१

क्र.कोविमं/उ.मा.गोप.प्रात्य/
दिनांकः- ३१.०८.२०२१

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यता प्राप्त शाळा /कनिष्ठ महाविद्यालये,सातारा,सांगली,कोल्हापूर.

इ. १० वी/१२वी सप्टेंबर/ऑक्टोबर २०२१ पुरवणी परीक्षा वेळापत्रकाबाबत प्रकटन माहितीकरिता सोबत जोडले आहे. त्याअनुषगांने उचित कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)